॥ कवित्व आणि कवी ॥

समर्थ रामदास स्वामींचे कवी आणि कवित्व यांवर
अविस्मरणीय व चिंतनीय विचार:

कवित्वशब्दसुमनमाळा । अर्थपरिमळ आगळा ।
तेणें संतषट्पदकुळा । आनंद होय ॥ १ ॥
ऐशी माळा अंत:करणीं । गुंफून पूजा रामचरणीं ।
ॐकार तंतु अखण्डपणीं । खण्डोंचि नये ॥ २ ॥
परोपकाराकारणें । कवित्व अवश्य करणें ।
तया कवित्वाचीं लक्षणें । बोलिजेति ॥ ३ ॥
जेणें घडे भगवद्भक्ति । जेणें घडे विरक्ति ।
ऐशिया कवित्वाची युक्ति । आधीं वाढवावी ॥ ४ ॥
क्रियेवीण शब्दज्ञान । तया न मानिती सज्जन ।
म्हणोन देव प्रसन्न । अनुतापें करावा ॥ ५ ॥
देवाचेनि प्रसन्नपणें । जें जें घडे बोलणें ।
तें अत्यंत श्लाघ्यवाणें । या नांव प्रासादिक ॥ ६ ॥
धीट पाठ प्रासादिक । ऐसें बोलती अनेक ।
तरी हा त्रिविध विवेक । बोलिजेल ॥ ७ ॥
धीट म्हणिजे धीटपणें बोले । जें जें आपुल्या मनास आलें ।
बळेंचि कवित्व रचिलें । त्या नांव धीट बोलिजे ॥ ८ ॥
पाठ म्हणिजे पाठांतर । बहु पाहिलें ग्रंथांतर ।
तयासारिखें उत्तर । आपणही केलें ॥ ९ ॥
शीघ्रचि कवित्व केलें । दृष्टी पडिलें तें वर्णिलें ।
भक्तीवांचून जें केलें । त्या नांव धीटपाठ ॥ १० ॥
कामिक रसिक शृङ्गारिक । वीर हास्य प्रस्ताविक ।
कौतुक विनोद अनेक । या नांव धीटपाठ ॥ ११ ॥
मन झालें कामाकार । तैसेच निघती उद्गार ।
धीटपाठें परस्पर । पाविजेत नाहीं ॥ १२ ॥
व्हावया उदरशांति । करणें लागे नरस्तुति ।
तेथें केली जे व्युत्पत्ति । या नांव धीटपाठ ॥ १३ ॥
कवित्व नसावें धीटपाठ । कवित्व नसावें खटपट ।
कवित्व नसावें उद्धट । पाषाण्डमतें ॥ १४ ॥
कवित्व नसावें वादांग । कवित्व नसावें रसभंग ।

कवित्व नसावें रंगभंग। दृष्टांतहीन॥ १५ ॥
कवित्व नसावें पाल्हाळ। कवित्व नसावें बाष्कळ।
कवित्व नसावें कुटिल। लक्षूनियां॥ १६ ॥
हीन कवित्व नसावें। बोलिलेंचि न बोलावें।
छंदभंग न करावें। मुद्राहीन॥ १७ ॥
व्युत्पत्तिहीन तर्कहीन। कळाहीन शब्दहीन।
भक्तिज्ञानवैराग्यहीन। कवित्व नसावें॥ १८ ॥
भक्तिहीन जें कवित्व। तेंचि जाणावें ठोंबें मत।
आवडीविण वक्तृत्व। कंटाळवाणें॥ १९ ॥
भक्तिवीण जो अनुवाद। तोचि जाणावा विनोद।
प्रीतीविण संवाद। घडे केंवीं॥ २० ॥
असो धीटपाठ तें ऐसें। नाथिलें अहंतेचें पिसें।
आतां प्रासादिक तें कैसें। सांगिजेल॥ २१ ॥
वैभव कांता कांचन। ज्यासी वाटे हें वमन।
अंतरीं लागलें ध्यान। सर्वोत्तमाचें॥ २२ ॥
जयास घडीनें घडी। लागे भगवंतीं आवडी।
चढती वाढती गोडी। भगवद्भजनाची॥ २३ ॥
जो भगवद्भजनेंविण। जाऊं नेदी एक क्षण।
सर्वकाळ अंतःकरण। भक्तिरंगें रंगलें॥ २४ ॥
जया अंतरीं भगवंत। अचल राहिला निवांत।
तो स्वभावें जें बोलत। तें ब्रह्मनिरूपण॥ २५ ॥
अंतरीं बैसला गोविंद। तेणें लागला भक्तिछंद।
भक्तीविण अनुवाद। आणीक नाहीं॥ २६ ॥
आवडी लागली अंतरीं। तैशीच वदे वैखरी।
भावें करुणा कीर्तन करी। प्रेमभरें नाचत॥ २७ ॥
भगवंतीं लागलें मन। तेणें नाठवे देहाभिमान।
शंका लज्जा ते पळून। दूरी ठेली॥ २८ ॥
तो प्रेमरंगें रंगला। तो भक्तिमदें मातला।
तेणें अहंभाव घातला। पायांतळीं॥ २९ ॥
गात नाचत निःशंक। तयास कैंचे दिसती लोक।
दृष्टीं त्रैलोक्यनायक। वसोनि ठेला॥ ३० ॥
ऐसा भगवंतीं रंगेला। आणीक कांहीं नलगे त्याला।
स्वइच्छा वर्णूं लागला। ध्यान कीर्ति प्रताप॥ ३१ ॥
नाना ध्यानें नाना मूर्ती। नाना प्रताप नाना कीर्ती।
तयापुढें नरस्तुती। तृणतुल्य वाटे॥ ३२ ॥
असो ऐसा भगवद्भक्त। जो ये संसारीं विरक्त।

तयास मानिती मुक्त। साधुजन॥ ३३ ॥
त्याचे भक्तीचें कौतुक। त्या नांव प्रासादिक।
सहज बोलतां विवेक। प्रगट होय॥ ३४ ॥
ऐका कवित्वलक्षण। केलें केलें निरूपण।
जेणें निवे अंतःकरण। श्रोतयांचें॥ ३५ ॥
कवित्व असावें निर्मळ। कवित्व असावें रसाळ।
कवित्व असावें प्रांजळ। अन्वयाचें॥ ३६ ॥
कवित्व असावें भक्तिबळें। कवित्व असावें अर्थागळें।
कवित्व असावें वेगळें। अहंतेसी॥ ३७ ॥
कवित्व असावें कीर्तीवाड। कवित्व असावें रम्य गोड।
कवित्व असावें जाड। प्रतापाविषयीं॥ ३८ ॥
कवित्व असावें सोपें। कवित्व असावें अल्परूपें।
कवित्व असावें सुरूपें। चरणबद्ध॥ ३९ ॥
मृदु मंजुळ कोमळ। भव्य अद्भुत विशाळ।
गौल्य माधुर्य रसाळ। भक्तिरसें॥ ४० ॥
अक्षरबंध पदबंध। नाना चातुर्यप्रबंध।
नाना कौशल्यता छंदबंध। धाटी मुद्रा अनेक॥ ४१ ॥
नाना युक्ति नाना बुद्धि। नाना कळा नाना सिद्धि।
नाना अर्थान्वय साधी। या नांव कवित्व॥ ४२ ॥
नाना साहित्य नाना दृष्टांत। नाना तर्क धातु मत।
नाना संमति सिद्धांत। पूर्वपक्षेंसी॥ ४३ ॥
नाना गति नाना व्युत्पती। नाना मति नाना स्फूर्ति।
नाना धारणा नाना धृती। या नांव कवित्व॥ ४४ ॥
शंका आशंका प्रत्यंतरें। नाना वाक्यें शास्त्राधारें।
तुटे संशयो निर्धारें। निर्धारितां॥ ४५ ॥
नाना प्रसंग नाना विचार। नाना योग नाना विवर।
नाना तत्त्वचर्चासार। या नांव कवित्व॥ ४६ ॥
नाना साधनें पुरश्चरणें। नाना तपें तीर्थाटनें।
नाना संदेह फेडणें। या नांव कवित्व॥ ४७ ॥
जेणें अनुताप उपजे। जेणें लौकिक लाजे।
जेणें ज्ञान उमजे। या नांव कवित्व॥ ४८ ॥
जेणें ज्ञान हें प्रबळे॥ जेणें वृत्ति हे मावळे।
जेणें भक्तिमार्ग कळे। या नांव कवित्व॥ ४९ ॥
जेणें देहबुद्धि तुटे। जेणें भवसिंधु आटे।
जेणें भगवंत प्रगटे। या नांव कवित्व॥ ५० ॥
जेणें सद्वस्तु भासे। जेणें भास हा निरसे।

जेणें भिन्नत्व नासे। या नांव कवित्व॥ ५१ ॥
जेणें घडे समाधान। जेणें तुटे संसारबंधन।
जयास मानिती सज्जन। या नांव कवित्व॥ ५३ ॥
ऐसें कवित्वलक्षण। सांगतां तें असाधारण।
परंतु कांहीं निरूपण। बुझावया केलें॥ ५४ ॥

दासबोध दशक १४ समास ३

आतां वंदूं कवीश्वर। जे शब्दसृष्टीचे ईश्वर।
नातरी हे परमेश्वर। वेदावतारी॥ १ ॥
कीं हे सरस्वतीचें निजस्थान। कीं हे नाना कळांचें जीवन।
नाना सद्विद्यांचें भुवन। यथार्थ होय॥ २ ॥
कीं हें पुरुषार्थाचें वैभव। कीं हे जगदीश्वराचें महत्व।
नाना लाघवें सत्कीर्तीस्तव। निर्माण कवी॥ ३ ॥
कीं हे शब्दरत्नांचे सागर। कीं हे मुक्तांचे मुक्तसरोवर।
नाना बुद्धीचे वैरागर। निर्माण जाहले॥ ४ ॥
कीं हे अध्यात्म रत्नांची खाणी। कीं हे बोलके चिंतामणी।
नाना कामधेनूंची दुभणी। वोळली श्रोतयांवरी॥ ५ ॥
कीं हे कल्पनेचे कल्पतरु। कीं हे मोक्षाचे मुख्य पडिभरू।
नाना सायुज्यतेचे विस्तारू। विस्तारले॥ ६ ॥
कीं हा परलोकींचा निजस्वार्थु। कीं हा योगियांचा गुप्त पंथु।
नाना ज्ञानियांचा परमार्थु। स्वरूपासि आला॥ ७ ॥
कीं हे निरंजनाची खूण। कीं हे निर्गुणाची वोळखण।
मायाविलक्षणाचें लक्षण। ते हे कवी॥ ८ ॥
कीं हा श्रुतीचा भावगर्भ। कीं हा परमेश्वराचा अलभ्य लाभ।
नातरी होय सुलभ। निजबोध कविरूपें॥ ९ ॥
कवि मुमुक्षूंचें अंजन। कवि साधकांचें साधन।
कवि सिद्धांचें समाधान। निश्चयात्मक॥ १० ॥
कवि स्वधर्माचा आश्रय। कवि मनाचा मनोविजय।
कवि धार्मिकांचा विनय। विनयकर्ते॥ ११ ॥
कवि वैराग्याचें लक्षण। कवि भक्तांचें भूषण।
नाना स्वधर्मांचें रक्षण। ते हे कवी॥ १२ ॥
कवि प्रेमळांची प्रेमळ स्थिति। कवि ध्यानस्थांची ध्यानमूर्ती।
कवि उपासकांची वाड कीर्ती। विस्तारली॥ १३ ॥
कवि नाना साधनांचें मूळ। कवि नाना प्रयत्नांचें फळ।

नाना कार्यसिद्धि सकळ। कवींचेनि प्रसादें॥ १४ ॥
आधीं कवींचा वाग्विलास। तरी मग श्रवणीं तुंबळे रस।
कवींचेनि मतिप्रकाश। कवित्वास होय॥ १५ ॥
कवि व्युत्पन्नांची योग्यता। कवि सामर्थ्यवंतांची सत्ता।
कवि विचक्षणांची कुशलता। नानाप्रकारें॥ १६ ॥
कवि कवित्वाचा प्रबंध। कवि नाना धाटी मुद्रा छंद।
कवि गद्यपद्यभेदाभेद। पदप्रासकर्ते॥ १७ ॥
कवि सृष्टीचा अलंकार। कवि लक्ष्मीचा शृंगार।
सकळ सिद्धिंचा निर्धार। ते हे कवी॥ १८ ॥
कवि सभेचे मंडण। कवि भाग्याचें भूषण।
नाना सुखांचें संरक्षण। ते हे कवी॥ १९ ॥
कवि देवांचे रूपकर्ते। कवि ऋषींचें महत्व वर्णिते।
नाना शास्त्रांचे सामर्थ्यातें। कवि वाखाणिती॥ २० ॥
नसता कवीचा व्यापार। तरी कैंचा असता जगदुद्धार।
म्हणोनि कवि हे आधार। सकळ सृष्टीसी॥ २१ ॥
नाना विद्या ज्ञातृत्व कांहीं। कवीश्वरेंवीण तें नाहीं।
कवीपासून सर्वही। सर्वज्ञता॥ २२ ॥
मागां वाल्मीक व्यासादिक। जाले कवीश्वर अनेक।
तयांपासून विवेक। सकळ जनांसी॥ २३ ॥
पूर्वी काव्यें होतीं केलीं। तरीच व्युत्पत्ति प्राप्त झाली।
तेणें पंडितां आंगीं बाणली। परम योग्यता॥ २४ ॥
ऐसे पूर्वी थोर थोर। जाले कवीश्वर अपार।
आतां आहेत पुढें होणार। नमन त्यान सी॥ २५ ॥
नाना चातुर्याच्या मूर्ती। कीं हे साक्षात् बृहस्पति।
वेद श्रुति बोलों म्हणती। ज्यांच्या मुखें॥ २६ ॥
परोपकाराकारणें। नाना निश्चय अनुवादणें।
शेखीं बोलिले पूर्णपणें। संशयातीत॥ २७ ॥
कीं हे अमृताचे मेघ वोळले। कीं हे नवरसांचे बोध लोटले।
नाना सुखांचें उचंबळलें। सरोवर हें॥ २८ ॥
कीं हे विवेकनिधीचीं भांडारें। प्रगट जाहलीं मनुष्याकारें।
नाना वस्तूंचेनि विचारें। कोंदाटले हे॥ २९ ॥
कीं हे आदिशक्तीचें ठेवणें। नानापदार्थांसी आणी उणें।
लाधलें पूर्वसंचिताच्या गुणें। विश्वजनांसी॥ ३० ॥
कीं हे सुखाचीं तारवें लोटली। अक्षय आनंदें उतटलीं।
विश्वजनांसी उपयोगा आलीं। नाना प्रयोगांकारणें॥ ३१ ॥
कीं हे निरंजनाची संपत्ती। कीं हे विराटाची योगस्थिति।

कीं हे भक्तीची फलश्रुती। फळासि आली॥ ३२ ॥
कीं हा ईश्वराचा पवाड। पाहतां गगनाहून वाड।
ब्रह्मांडरचनेहून जाड। कविप्रबंधरचना॥ ३३ ॥
आतां असो हा विस्तार। जगासी आधार कवीश्वर।
तयांसी माझा नमस्कार। साष्टांगभावें॥ ३४ ॥

दासबोध दशक १ समास ७

प्रेषक: सुंदर हट्टंगडी(gourish@internet1.net)